**भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र शासन, नागपूर**

२७ "खनिज भवन", सिमेंट रोड, शिवाजी नगर, नागपूर-१०

Email-director@mahadgm.gov.in **"आदेश"** दुरध्वनी क्र. ०७१२-२२२०७५०

---

क्र.आस्था-९७८/कविअ/२०१९/ २०३१ दिनांक :- 19 AUG 2019

**वाचा:-** १) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन पत्र क्र. एमएनए-१०१९/प्र.क्र.०२/उद्योग-९, दि.०५/०२/२०१९

२) या संचालनालयाची कंत्राटी तत्वावर विधी अधिकारी नियुक्ती बाबतची जाहिरात दि.२०/०६/२०१९

३) या संचालनालयाचे पत्र क्र. आस्था-९६५ / २०१९ / ११८३, दिनांक ०८/०८/२०१९

संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, नागपूर तसेच मंत्रालयातील संबंधित प्रशासनिक विभाग (उद्योग-९) यांचेकडील कामकाजाबाबत उद्‌भवलेल्या प्रकरणांचे न्यायालयीन कामाकरीता संचालनालयाचे कंत्राटी विधी अधिकारी पदाच्या अटी व शर्तींच्या अधिन राहून खाली नमूद कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडण्याकरीता श्रीमती कांचन गिरीष निंबुळकर यांची कंत्राटी तत्वावरील विधी अधिकारी या पदावर दरमहा रूपये ३०,००० + दुरध्वनी व प्रवासखर्च रूपये ५००० असे एकूण रूपये ३५,०००/- एवढया मासीक मानधन वर निव्वळ कंत्राटी तत्वावर त्या रूजू होतील त्या दिनांकापासून ११ महिन्यांकरीता तात्पुरती नियुक्ती करण्यात येत आहे.

**कंत्राटी विधी अधिकाऱ्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या :-**

१) संचालनालयस्तर व मंत्रालयीनस्तर (उद्योग-९) यांचे कामकाजाशी संबंधित कायदेविषयक बाबींबाबत / न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.

२) न्यायालयीन प्रकरणांचे परिच्छेदनिहाय अभिप्राय (Parawaise Comments) तयार करणे / खनिज सवलती विषयक / सेवाविषयक / प्रशासकीय बाबी विषयक / विभागीय चौकशी इत्यादी बाबत तथा समकालीन कायद्याची प्रस्थापित स्थितीबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.

३) प्रलंबीत न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी संबंधीत सरकारी वकीलाकडे पाठपुरावा करणे, जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी मा. न्यायाधिकरणात सादर करावयाचे प्रतिज्ञापत्र संबंधित अधिकाऱ्यांच्या मदतीने तयार करणे.

४) शपथपत्राचा मसूदा तयार करणे व त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेवून विहीत मुदतीत सादर होईल याची दक्षता घेणे.

५) जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे अशा प्रकरणांमध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करून तद्‌अनुषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.

६) अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपीलाचा मसूदा तयार करून तो संबंधित शासकीय अधिवक्ताकडे पाठविणे व अपीलचा अंतीम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे.

७) न्यायालयीन प्रकरणांसाठी संचालनालय तसेच प्रशासनिक विभाग (उद्योग-९) स्तरावरील "नोडल ऑफीसर" म्हणून काम पाहणे.

८) विधी विषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमून दिलेले कार्य विहीत मुदतीत पार पाडणे.

९) सर्व न्यायालयीन प्रकरणात सुनावणी तारखेस उपस्थित राहून कामकाजासंबंधी अद्यावत माहिती (प्रगती अहवाल) लेखी स्वरूपात सादर करणे.

**अटी व शर्ती :-**

१) कंत्राटी विधी अधिकारी पदावर रूजू होण्यापूर्वी कराराचे विहीत परिशिष्ट 'ब' मध्ये करारपत्र द्यावे लागेल.

२) सदर नेमणूक मासीक मानधनावर कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरूपाची आहे.

३) कुटूंबाचे प्रमाणपत्र व प्रतिज्ञापत्र नमुना- अ मध्ये सादर करावे लागेल.

४) आदेश प्राप्त झाल्यापासून ३ दिवसाचे आंत रूजू व्हावे लागेल अन्यथा आपणास नोकरीची गरज नाही असे गृहीत धरून निवडसूचीतील उमेदवारास नियुक्ती देण्यात येईल व त्यानंतर आपला कोणताही उजर ऐकून घेतल्या जाणार नाही.

५) शासनाने वेळोवेळी निर्धारीत केलेल्या अटी बंधनकारक राहतील.

६) नियुक्तीनंतर सेवा सोडून जायचे असल्यास एक महिना अगोदर त्याबाबत लेखी पूर्वसूचना द्यावी लागेल किंवा एक महिन्याच्या मासीक मानधनाऐवढी रक्कम शासन खजिनादाखल करावी लागेल.

७) नेमणूकीच्या कालावधीत मुख्यालय नागपूर राहील, एकत्रित मानधना व्यतिरिक्त सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेशिवाय कोणतेही भत्ते देय राहणार नाहीत.

८) नेमणूकीचे कालावधीत इतर खाजगी नोकरी / व्यवसाय वा इतर संस्थेत काम करता येणार नाही.

९) कार्यालयातील कामकाजाबाबत गोपनीयतेचा भंग होता कामा नये व वर्तणुकी संदर्भातील कोणतीही तक्रार येता कामा नये.

वरील पैकी कोणत्याही अटींचे उल्लंघन केल्यास नियुक्ती दिलेल्या कालावधीपूर्वी कंत्राटी विधी अधिकारी पदावरील सेवा संपुष्टात आणण्यात येईल.

स्वा./- (रा. शि. कळमकर)
संचालक,
भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय,
महाराष्ट्र शासन, नागपूर

**प्रत :-**

मा. अतिरिक्त मुख्य सचिव (उद्योग) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय मुंबई-३२ यांना माहितीस्तव सादर.

**प्रत माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.**

१) प्रभारी अधिकारी, आस्थापना शाखा / लेखा शाखा / गोपनीय शाखा / खनि शाखा / योजना शाखा / प्रकल्प शाखा/ तांत्रिक शाखा / सांख्यिकी शाखा / भांडार व वाहन विभाग, प्रमुख कार्यालय, नागपूर.

२) लेखा विभाग (अंदाजपत्रक) / निवडनस्ती, प्रमुख कार्यालय, नागपूर.

३) श्रीमती कां. गि. निंबुळकर, २४८, बजाज नगर, नागपूर- ४४००१० यांना अनुपालनार्थ अग्रेषित.

19-8-2019
(रा. दे. चव्हाण)
प्रशासन अधिकारी,
भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय,
महाराष्ट्र शासन, नागपूर.

(मा. संचालकांनी मान्य केलेले प्रारूप)